# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा. क्र./ गों. वि. /म. वि. वि. वि./२०१४/२०२३ दि.२३/११/२०२३

## परिपत्रक

विषय :- महाविद्यालयातील नवनियुक्त प्राचार्य/शिक्षक यांना महाविद्यालयात रुजु दिनांकापासुन पुढे मान्यता प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :- १. दिनांक १३ ऑक्टोंबर २०२३ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेतील बाब क्रमांक १३२ (७) च्या निर्णयानुसार.

२.विद्यापीठाचे पत्र क्रमांक गों. वि. /म. वि. वि. वि./२०६५/२०२२ दिनांक २१/०३/२०२२

संदर्भीय पत्र क्रमांक २ नुसार निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक या पत्राव्दारे रद्द करण्यात येत आहे. विद्यापीठाशी संलंग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, विद्यापीठाचे संदर्भीय पत्र क्रमांक २ नुसार महाविद्यालयातील नवनियुक्त प्राचार्य/शिक्षक यांना विद्यापीठाकडुन मान्यता मिळाल्यानंतरच रुजु करुन घेण्यात यावे. विद्यापीठ मान्यतेशिवाय नियुक्त प्राचार्य व शिक्षक यांना रुजु करुन घेतल्यास सदर रुजु दिनांक विद्यापीठाकडुन ग्राहय समजण्यात येणार नाही तसेच सदर बाबतीत कोणतेही न्यायालयीन प्रकरण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी हि संस्थेचे अध्यक्ष/सचिव व महाविद्यालयाच्या प्राचार्य यांची राहील याबाबत कळविण्यात आले होते.

परंतु दिनांक १३ ऑक्टोंबर २०२३ रोजी संपन्न झालेल्या मा. व्यवस्थापन परीषदेमध्ये " महाविद्यालयातील नवनियुक्त प्राचार्य/शिक्षक यांना महाविद्यालयात रुजु दिनांकापासुन पुढे मान्यता प्रदान करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला तसेच या संबंधाने कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे बंधपत्र प्रस्तावासोबत घेण्यात यावे " असा निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापी यापुढे महाविद्यालयातील नवनियुक्त प्राचार्य/शिक्षक यांच्या मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठात सादर करतांना वर नमुद प्रमाणे झालेल्या निर्णयानुसार बंधपत्र (१०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर) प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य राहील, याची नोंद घ्यावी.

मा. प्र- कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार

२३/११/२३

(देवेंद्र एम झाडे)
उपकुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलंग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी :-

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.